INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 11 | DECEMBER - 2020

# महानुभाव संप्रदाय

वामन रामराव वैद्य
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, इतिहास स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय,
मंठा, जि. जालना, महाराष्ट्र.

## प्रस्तावना,



महानुभाव संप्रदाय हा उत्तर भारतात उगम पावला आणि सर्व भारतभर आपला प्रभाव या संप्रदायाने जनसामान्यांवर टाकला. सुकृत दर्शनी पाहता हा संप्रदाय अवैदिक वाटला तरी गीता, भागवत, श्रीकृष्ण आणि दत्त यांना मानणारा चक्रधर प्रणित महानुभाव संप्रदाय असून या संप्रदायाचा सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक दृष्टीने आपल्याला थोडक्यात परिचय करून घ्यावयाचा आहे.

महानुभाव संप्रदायाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांच्या वेळी महाराष्ट्रात देवगिरीच्या यादवांची सत्ता होती. देवगिरीचे यादव राजे वैदिक संस्कृतीचे अभिमानी असून विद्या व कला यांचे भोक्ते होते. तसेच ज्योतिष शास्त्र, संगीत शास्त्र, वेदांत शास्त्र, धर्मशास्त्र, व्याकरण शास्त्र इत्यादीवर संस्कृत भाषेत विविध प्रकारे ग्रंथरचना होत होती..अनेक विद्वान त्या काळात होऊन गेले. भास्कराचार्य, लक्ष्मीधर, चांगदेव यांच्यासारखे विद्वान ज्योतिषी. संगीत रत्नाकरकार शारंगधर, बोपदेव आणि हेमाद्री यांच्यासारखे महापंडित याच कालखंडातील होते. विद्वत्ता आणि संस्कृत ग्रंथनिर्मिती मुळे राजदरबारी त्यांचा दबदबा होता. सांस्कृतिक दृष्ट्या समाजातील उच्च पातळीवर असलेली ही समृद्धी जनसामान्यांच्या दृष्टीने नगण्य होती. स्वाभाविकपणे यादव काळातील ह्या संस्कृतीक घडामोडी, तत्कालीन लोक जीवनाला वळण लावू शकल्या नाहीत. सांस्कृतिक जीवनात संस्कृत भाषेचा प्रामुख्याने पुरस्कार होत असल्यामुळे लोकभाषेतून लोक जीवनाला सुसंस्कृत करणारी परंपरा अजून रुजलेली नव्हती. म्हणून या संप्रदायाने लोक भाषेतील ग्रंथ निर्माण करून ती परंपरा रुजविण्याचा प्रयत्न केला.त्या काळातील लोकजीवन धर्माशी निगडीत होते. राजाश्रय असलेल्या वैदिक धर्मात दव्देत- अद्वेत, ज्ञानयोग-कर्मयोग, स्मार्त भागवत अशी विविध मतप्रणाली प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने मांडत होता. त्यासाठी गीता, उपनिषदे, ब्रह्मसूत्रे या वरील टीका भाष्य होत होते. संपूर्ण धार्मिक विचारांचे आदानप्रदान सामान्यांपासून दूर असलेल्या संस्कृत भाषेत होते. स्वाभाविकपणे ही भाषा समाजाला अवगत नसल्यामुळे फार मोठा समाज या धार्मिक तत्त्वज्ञानापासून वंचीत झालेला होता. उच्च वर्ग हा देवप्रित्यर्थ केलेली हजारो व्रते, उपवास तीर्थयात्रा, कर्मकांडात गुरफटून गेलेला होता. सर्वसामान्य समाज अज्ञानाने निरनिराळ्या देवतांच्या तामसी उपासनेतच परमार्थ मानीत होता. याच काळात जैन, नाथ, लिंगायत या धर्म संप्रदायांनी पारमार्थिक दृष्ट्या सर्वसमावेशक पातळीवरून प्रचार कार्य चालू ठेवले होते.

सामान्य जनतेला त्यांच्याविषयी आकर्षण वाटू लागल्यामुळे लोक तिकडे धावत होते. या काळात मुसलमानांची सत्ता उत्तर भारतात दृढमूल झाली होती. तरी पण त्यांची झळ दक्षिणेपर्यंत पोहोचलेली नव्हती. तथापि दक्षिणेत इस्लाम धर्मीयांचे याहीपेक्षा प्रभावी आणि परिणामी असे आक्रमण धर्म प्रचाराच्या रुपाने यापूर्वी झालेले होते.

या परिस्थितीचा बारकाईने विचार करून चक्रधरांनी इ.स. तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात महानुभाव संप्रदायाची स्थापना केली. वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक संत ज्ञानेश्वरांचा जन्म इ.स.१२७५ ला झाला असे मानले. तर महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्री चक्रधर यांचा प्रयाण काळ इ.स. १२७४ होय. म्हणजे ज्ञानदेवांचा उदय होण्यापूर्वी महानुभाव संप्रदाय महाराष्ट्रात दृढमूल झाला होता.

## श्री चक्रधर स्वामींचे चरित्र

महानुभाव संप्रदायाचे संस्थापक आणि पंचकृष्णात समाविष्ट झालेले अवतारी पुरुष चक्रधर यांचे मूळ नाव हरपाळदेव गुजराती मधील भरवस ( भडोच) राज्याचा राजा मल्लदेव यांच्या विशाल देव नावाच्या प्रधानाचा हा पुत्र होता. शके १११६ ( सन ११९४) हा त्यांचा जन्म काळ होता. सिंघण राजाने गुजरात वर स्वारी केली असता बावीस वर्षाच्या या हरपळ देवाने चांगलेच शौर्य दाखविले होते त्याच्या पत्नीचे नाव कमळाईसा पुढे हरपाळदेवाला द्युताचे व्यसन जडले. वयाच्या २६ व्या वर्षी हरपाळदेव एकाएकी मरण पावला. त्यावेळी फलटणचे नाथ सिद्ध पुरुष द्वारावतीकर चांगदेव राऊळ यांनी देहत्याग करून हरपळ देवाच्या मृत शरीरात प्रवेश केला. चांगदेव राउळांच्या देहत्यागाचे कारण कामाख्या नामक योगिनी, त्यांच्या ब्रह्मचर्याची परीक्षा पाहण्याच्या उद्देशाने, 'रतीची या चाडा' येऊन दुराग्रह करू लागली. हे होय. अशा रीतीने नव चैतन्य प्राप्त झालेल्या हरपाल देवाने पत्नीसमवेत पुन्हा कालक्रमणा करावयास सुरुवात केली. पुढे द्युतात द्रव्य नाश होऊन त्यांनी पत्नीला दागिन्यांची मागणी केली असता तिने दिलेले उत्तर ऐकून त्यांच्या मनाला उपरती झाली. आणी घरादाराचा त्याग करून त्यांनी रामटेक ची वाट धरली. पुढे गोविंद प्रभु गुंडम राऊळ यांची भेट झाली. आणि तेव्हळि येणे परावर शक्ती स्वीकारली आन चक्रधरू हे नाम स्विकारले. त्यानंतर त्यांनी सालबर्डीच्या डोंगरावर एकांतात बारा वर्षे तपश्चर्या केली. या तपश्चर्येच्या काळात तेथे तपस्विनी मुक्ताबाई यांची भेट झाली. बारा वर्षाच्या तपश्चर्येनंतर त्यांनी देशाटनाला सुरुवात केली. या संचारातच पाणीपात्र करण्यासाठी दीक्षा वृत्ती स्विकरण्यासाठी ते काटोल नगरात गेले असता द्वारावती कर चांगदेव शिष्य उधळी नाथ त्यांच्याकडून त्यांनी वयस्तंभिनी विद्या प्राप्त करून घेतली. पुढे विरक्त वृत्तीने संचार करीत ते वरंगल भागात आले आणि तेथील एका घोड्यांच्या व्यापाऱ्याच्या हंसाबा नामक कन्येशी विवाह केला. तिच्या समवेत काही काळ सुखात घालवीत असताना एका अवधूता च्या दर्शनाने त्यांच्यातील विरक्ति ने पुन्हा उचल खाल्ली त्यामुळे हंसा बेला स्थित्यनंदात ठेवून त्यांनी पुनश्च भ्रमण करण्यास सुरुवात केली. या भ्रमण काळातच त्यांना अचलापूरला राम दरम्याने त्यांना घरी नेले . त्यांना पाहून गावचे लोक कुजबूज करीत राम दरण्याते लेखी वाढत असे. हे जावाई करावया आणिले असती आणि खरोखर तसेच घडले. चक्रधरांचा हा विवाह काळ ३ वर्षे टिकला एकदा ते चंद्रभागेत स्नान करीत असता,खोल पाण्यात शिरून वाहत गेले. राउळ बुडाले, राउळ बुडाले अशी वार्ता पसरली ती ऐकून पत्नी गौरीला धक्का बसला. त्यातच ती गतप्राण झाली चक्रधर नदीकिनारी आले असता पत्नीच्या निधनाची वार्ता त्यांना समजली आणि ते दुःखीकष्टी झाले. पुन्हा विरक्तीचे सावट घेऊन ते एकाकी भ्रमण करू लागले.

यानंतर चक्रधरांनी भंडाऱ्यात भंडारेकर नावाचे ग्रहस्थ अनुयायी म्हणून भेटले. पुढे रामदेव तथा दोदोस, नागुबाई आणि बोणेबाई इत्यादी शिष्य शिष्या येऊन मिळाल्या. यानंतर भोगावतीच्या तीरावर त्यांना श्री दत्तात्रेयाचे दर्शन झाले होते. आणि याठिकाणी लीळाचरित्रा नुसार त्यांचा एकाक म्हणजे (एकाकी) कालखंड संपतो. चक्रधरांनी घाटी क्षौर, करून यतिमुनीचा वेष धारण केला. (इ.स.१६६८) आणि नंतर धर्म प्रसारार्थ आपले उर्वरित आयुष्य वेचले.

अशा तऱ्हेने लीळा चरित्रनुसार पुर्वाधाला सुरुवात होऊन, नागदेवाच्या अनुसरणा पर्यंत तो संपतो. उत्तरार्ध नाग देवांच्या अनुसरणापासून चक्रधरांच्या उत्तरापंथे म्हणजे निर्वाणा पर्यंत मानला जातो. पूर्वार्ध आणि उत्तरार्ध मिळून आठ वर्षाचा हा कालखंड.या काळातच चक्रधरांनी आपल्या विचारांचा आणि त्यानुसार आचार धर्माचा उपदेश केला. श्रद्धायुक्त अंतकरणातून निर्माण झालेल्या परंतु वास्तवाच्या कसोटीवर पारखून घेतलेल्या लीळाचरित्रातील लिलातून त्यांच्या व्यक्तित्वाचे सर्वांगीण दर्शन घडत

## चक्रधरांचा मृत्यू

चक्रधरांचे निर्वाण हा वादग्रस्त प्रश्न ठरलेला आहे. कारण चक्रधरांचा मृत्यू झालेला नसून त्यांचा यादवांचा करण आधी हेमाद्री यांच्याकडून वध केला गेला असा निष्कर्ष काढला आहे या आशयाच्या लिहिला त्यांनी या चरित्राच्या परिशिष्ट क्रमांक ९ मध्ये दिली आहे. त्याच्या आधारे चक्रधरांचा वध झाल्यावर पुन्हा जिवंत होऊन उत्तर आपण ते निघून गेल्याचे म्हटले आहे डॉक्टर सुरेश डोळके यांना या दोन्ही गोष्टी वाटतात त्याचे कारण देताना त्याने रत्नमाला स्तोत्रात या गोष्टीचा उल्लेख नाही असे सांगितले आहे.

## संप्रदायाचे मूळ नाव.

महानुभाव या नावाने हा संप्रदाय ओळखला जात असला तरी आरंभापासून त्याचे हेच नाव प्रचलित होते असे दिसत नाही. महानुभाव ग्रंथकारांनी हा शब्द संप्रदाय विशिष्ट अशा अर्थाने वापरलेला आहे की श्रेष्ठ असा अनुभव किंवा ज्ञान प्राप्त झालेला सत्पुरुष अशा अर्थाने वापरलेला आहे. तसेच महाराष्ट्रीय संत कवींनी हे याच सर्वसामान्य अर्थाने या शब्दाचा वापर अनेक वेळा केलेला आहे. सर्वसाधारणपणे निरंजन माधवांच्या काळी व नंतर या संप्रदायास महानुभाव हे नाव प्राप्त झाले असावे असा निष्कर्ष काही संशोधकांनी केलेला आहे. महात्मा  याही नावाने या संप्रदायाचे उल्लेख आलेले आहेत. तथापि चक्रधर आपल्या शिष्यांना आणि शिष्य एकमेकांना महात्मा असे परमार्थाने म्हणत असत.महत्मेनि प्रिय वक्ते या होआवे , तुम्ही महात्मे की गा वगैरे यावरून संप्रदायात अधिकार प्राप्त झालेल्या शिष्यांना महंतांना महात्मा हे विशेषण लावण्याच्या प्रवृत्तीतून सर्वसाधारण सोळाव्या शतकात महात्मापंथू या नावाने या संप्रदायाचा उल्लेख होऊ लागला. अशी दिसते याचा उल्लेख आला आहे संप्रदायाची नावे होऊ शकत नाहीत जय कृष्ण पंथ हे नाव या संप्रदायास  पंजाबात मिळाले .

## महानुभावांचे पंचकृष्ण

महानुभाव चार अवतार मानतात कृतयुगात हंसावतार, त्रेतायुगात दत्तावतार, द्वापारयुगात श्रीकृष्ण आणि कलियुगात श्रीचक्रधर. त्याचप्रमाणे पंचकृष्ण ही, ही महानुभावांची कल्पना वैशिष्ट्यपूर्ण आहे. सूत्रपाठत प्रारंभी जीवाच्या मुक्तीसाठी परमेश्वर घेत असलेल्या सगुणा वताराची कल्पना सांगून ५ परमेश्वर यांची नावे व गावे पुढीलप्रमाणे दिली आहेत.

जैसे द्वापारी श्री कृष्ण चक्रवर्ती //१//
जसे सैह्याद्री श्री दत्तात्रेय प्रभु //२//
जैसे व्दरावतीए  श्री चांगदेवो रिउळ.//३//
जैसे , ऋद्धि पुरी गुंडम राऊळ //४//
जैसे प्रतिष्ठानी श्री चांगदेव राऊळ //५//

वरील सूत्रानुसार श्रीकृष्ण दत्तात्रय प्रभू, श्री चांगदेव राऊळ, द्वारावतीकार गोविंदप्रभू आणि पैठणचे चांगदेव राउळ कथा श्री चक्रधर हे मानव भावाचे ५ कृष्ण अवतार होत.

अशा महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी व त्यांच्या पंथाची माहिती थोडक्यात या लेखामध्ये दिलेली आहे.

## संदर्भ ग्रंथ.

१) कोलते वि.भि, श्री चक्रधर
२) गोसावी र.रा. पाच भक्तिसंप्रदाय
३) देशपांडे य.खु महानुभवीय मराठी वाड्मय.